# संस्थापकांचे मनोगत

'योगः कर्मसु कौशल्यम।' बोधवाक्य असलेल्या कर्मयोग शिक्षण प्रसारक संस्था, आपातापा, ता. जि. अकोला द्वारा संचालित 'कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर अध्यापक अनुसंधान महाविद्यालय, आपोती खुर्द, ता. जि. अकोला (महाराष्ट्र राज्य) ची स्थापना 2008 ला करण्यात आली आहे. प्रस्तुत शिक्षण महाविद्यालयाचे 'अध्यापकीय व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास' हे ध्येय असून लोकशाही पद्धतीने महाविद्यालय प्रशासन व व्यवस्थापन करण्यात येत आहे. उच्चविद्याविभूषित प्राध्यापक वर्ग तसेच कर्तव्यनिष्ठ कर्मचारी वर्ग येथे लाभलेला आहे. या महाविद्यालयास उत्कृष्ट अशी निकालाची परंपरा लाभली असून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या गुणवत्ता यादीत या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्थान पटकाविले आहे, ही अभिमानाची व भूषणावह बाब आहे.

या महाविद्यालयात शिक्षकांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे एम.ए. (शिक्षणशास्त्र) व शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम केंद्र यशस्वीपणे व सक्षमपणे कार्यरत आहेत.

आपणसुध्दा येथील विविध उपक्रमात सहभागी होऊन आपले व्यक्तिमत्त्व बहुआयामी विकसित करावे तसेच या महाविद्यालयाची विद्यापीठीय उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे. आपण या अध्यापक महाविद्यालय शिक्षण स्नातक पदवी घेण्याकरिता प्रवेश घेतल्याबद्दल आपले मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करून शुभेच्छा देत आहे.

आपोती खु।।

डॉ.शांताराम गोवर्धन बुटे
संस्थापक तथा अध्यक्ष